जावक नं 5057 /१८
सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे
दिनांक २१/०७/२०१८

प्रति.
मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

यांना सविनय सादर,

**प्रतिवेदक** :- व्हि.जे. महांगडे, पोलीस उप निरीक्षक, सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे.
यांजकडुन विंनती पुर्वक की

**विषय** :- पळवुन नेलेल्या मुलीचा व अज्ञात आरोपीचे शोधकामी पोलीस नोटीस मध्ये प्रसिद्धी होणेबाबत......

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करतो की, सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे गु.र.न. ३१७/२०१८ भा.दं.वि. कलम ३६३ मधील फिर्यादी नामे – सौ. ललीता दिनेश शर्मा , यांनी फिर्याद दिली की दि. १७/०७/२०१८ रोजी दुपारी ११.१५ वा पासुन त्यांची मुलगी नामे सोनी दिनेश शर्मा हि तिची कॉलेजची मैत्रीण सिद्धी शिंदे हिचे सोबत सिंहगड कॉलेज नऱ्हे पुणे येथे कॉलेजचला जाते असे सांगुन राहते घरातुन बाहेर गेली असता तिस कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाकरीता पळवुन नेले आहे म्हणुन अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल आहे.

**मुलीचे नाव व वर्णन खालिलप्रमाणे –**



कु सोनी दिनेश शर्मा, वय- १७ वर्षे, ( जन्मतारीख १९/०४/२००१ ), धंदा- शिक्षण, रा. फ्लॅट नं. १८, पाचवा मजला विराज रेसीडेन्सी कुटेमळा नऱ्हे जाधववर कॉलेज जवळ पुणे, अंगाने सडपातळ, रंगाने - सावळी, उंची – ५ फुट ५ इंच चेहरा उभट, नाक - सरळ, डोळे- काळे पांढरे, डोक्याचे केस – मोकळे सोडते, नेसणीस – ग्रे रंगाचा हाफ बाह्याचा टॉप, निळ्या रंगाची जिन्स पॅंट, जवळ एक जांभळ्या रंगाची सॅकबॅग व त्यामध्ये कॉलेजचे वह्या पुस्तके इतर मौल्यवान चिजवस्तु पैसा अडका, मोबाईल फोन काही नाही. मराठी हिंदी इंग्रजी बोलते.

तरी सदर मुलीचा वर्तमान पत्रात वर्णन प्रसिध्द होणेस विनंती आहे. सदर मुलगी मिळुन आल्यास सिंहगडरोड पोलीस स्टेशन,फोन नं ०२०२४३४८२७० या नंबरवर कळविणेस विनंती आहे.